'अमरावती जिल्ह्याची एकुण लोकसंख्या २०११ च्या जनगणने नुसार २८,८७,८२६ इतकी आहे. ती महाराष्ट्र राज्याच्या एकुण लोकसंख्येपैकी २.५७ एवढी असून २००१ च्या तुलनेत त्यामध्ये १०.७७ ने वाढ झालेली आहे.

अमरावती जिल्ह्याची सामाजिक/जातीनिहाय लोकसंख्या पाहतांना त्यामध्ये मोठ्या प्रमाणात विविधता आढळून येते. जिल्ह्यात प्रामुख्याने हिंदु धर्म, बौद्ध धर्म, ख्रिश्चन धर्म, मुस्लीम धर्म, जैन धर्म व शिख धर्मिय लोक प्रामुख्याने आढळून येतात. यामध्ये

| | | |
|---|---|---|
| हिंदु धर्मिय | ७५.०४टक्के | ६५.२० टक्के |
| बौद्ध धर्मिय | १४.२८ टक्के | १२.१३ टक्के |
| मुस्लीम धर्मिय | १२.०२ टक्के | १२.०२ टक्के |
| ख्रिश्चन धर्मिय | ००.३४टक्के | ००.३४ टक्के |
| जैन धर्मिय | ००.५५टक्के | ००.५५ टक्के |

याप्रमाणात आढळून येतात. हिंदुची लोकसंख्या १८,८३,१४८, बौद्ध धर्मियांची लोकसंख्या ३,५०,४०३ इतकी तर मुस्लीम ३,४७,२५० व इतर बौद्ध २२,२५९ एवढे आहेत.

जिल्ह्यात ज्या जाती प्रामुख्याने आहेत त्यामध्ये कुणबी, महार, गोंड, कोरकू, राजपूत, धनगर, वाणी, बनिया, मांग, चांभार व ब्राह्मण इत्यादा.

'अमरावती जिल्ह्यात अनुसूचित जातींची एकूण लोकसंख्या ४,४६,६२३ एवढी असून जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ती टक्केवारी १७.१३ एवढी आहे.

अनुसूचित जाती संवर्गामध्ये प्रामुख्याने तीन लोकसंख्येने मोठ्या जाती आढळून येतात त्यामध्ये बौद्ध, मांग आणि भांबी होत. त्यामधील बौद्धांची एकूण लोकसंख्येचा ३,३७,६५१ एवढी आहे. मांग व इतर लोकांची संख्या ४४.८४१ टक्के असून भांबी आणि इतर मिळून २१,०६८ इतकी आहे.

जिल्ह्यात अनुसूचित जमातींची संख्यासुद्धा बऱ्याच प्रमाणात आढळून येते 'अनसूचित जमातींची एकुण लोकसंख्या ३,५६,५३३ एवढी असून ह्याचे प्रमाण धारणी, चिखलदरा व मेळघाट या भागात सर्वात जास्त आढळून येते. अनुसूचित जमातीमध्ये जिल्ह्यात प्रामुख्याने गोंड, कोरकू, पारधी व टाकोणकार यांचा समावेश होतो. कोरकू जमातींची एकूण लोकसंख्या १.९३,१९९ गोंड व इतर जमातींची संख्या ९५,३६३ एवढी आहे. तर पारधी २०,५६८ इतके आहेत. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अनुसूचित जमातीचे प्रमाण १३.६८ एवढे आहे.

अमरावती जिल्ह्यात ज्या विविध जाती अस्तित्त्वात आहेत, त्यात एकुण जिल्ह्याच्या लोकसंख्येशी प्रमाण पाहिल्यास

| | | |
|---|---|---|
| कुणबी | १,९३,२५५ | २४ टक्के |
| महार | १,०५,३०० | १४ टक्के |
| ब्राह्मण | २१,५०० | ०३ टक्के |
| राजपुत | १२,६७२ | ०२ टक्के |
| वाणी/बनिया | १६,२६४ | ०२ टक्के |
| गवळी | १६,३५३ | ०२ टक्के |
| धनगर | १७,८२६ | ०२ टक्के |
| मांग | १७,३२५ | ०२ टक्के |
| चांभार | | ०१ टक्के |

(२००१च्या जनगणनेनुसार टक्केवारी मध्ये)

| अ.क्र. | तहसील | अनुसूचित जाती/२०११ | अनुसूचित जमाती/२०११ |
|---|---|---|---|
| १ | धारणी | (२००१–०४.४) ४.२८ | ७५.६ ७७.०० |
| २ | चिखलदरा | (२००१–०७.०)६.८८ | ७५.४ ७८.९२ |
| ३ | अजनगाव सुर्जी | (२००१–१९.६)२०.२७ | ०३.२ २.४४ |
| ४ | अचलपूर | (२००१–१६.१)१६.८१ | १०.० ९.८ |
| ५ | चांदूरबाजार | (२००१–१८.५)१९.५ | ०८.२ ७.६३ |
| ६. | मोर्शी | (२००१–१६.५)१६.१ | १०.५ १०.८ |
| ७. | वरुड | (२००१–१४.०)१४.२३ | १७.९ १४.७६ |
| ८. | तिवसा | (२००१–१७.५)१७.३२ | ०४.० ३.८१ |
| ९. | अमरावती | (२००१–१७.२)१८.३९ | ०३.७ ३.१४ |
| १०. | भातकुली | (२००१–२४.२) २४.९८ | १३.० ८.२२ |
| ११ | दर्यापर | (२००१–२७.३) २७.२० | ०९.१ ७.१६ |
| १२. | नांदगाव खंडेश्वर | (२००१–२३.३) २३.४९ | ०४.४ ४.३१ |
| १३. | चादर रेल्वे | (२००१–१८.७) १९.९१ | ०५.१ ५.३ |
| १४. | धामणगाव रेल्वे | (२००१–१६.०) १६.८७ | ०८.४ ७.४५ |

स्रोत : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१३. अमरावती जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, आधार भारताची जनगणना, २०११

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 281 (CCLXXXI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

अमरावती जिल्हा उत्तर अक्षांश २०.३२ ते २१.४६ आणि पूर्व रेखाश ७६.३७ ते ७८.२७ असा वसलेला आहे. या जिल्ह्याच्या पूर्वेस व आग्नेयस वर्धा जिल्हा, व नैंतेस यवतमाळ जिल्हा, पश्चिमेस अकोला जिल्हा, उत्तरेस ईशान्येस मध्यप्रदेशातील बैतुल हा जिल्हा आहे.

'अमरावती जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ १२२१२ चौ.की. असून महाराष्ट्र राज्याच्या एकुण क्षेत्रफळांपैकी हे प्रमाण ०३.९६ एवढे आहे. अमरावती जिल्ह्यात एकुण १४ तालुक्यांचा समावेश होतो. त्यामध्ये १. अमरावती २. भातकुली ३. दर्यापूर ४. नांदगाव खंडेश्वर ५. अचलपूर ६. चांदुर बाजार ७. धारणी ८. अंजनगाव सुजी ९. चिखलदरा १०. मोर्शी ११. वरुड १२. धामणगाव रेल्व १३. चांदुर रेल्वे १४. तिवसा

त्याचप्रमाणे अमरावती जिल्ह्याचे ०६ प्रशासकीय उपविभाग करण्यात आले असून त्यात

१. अमरावती : अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर

२. दर्यापूर : दर्यापूर, अंजनगाव सुर्जी

३. अचलपूर अचलपूर, चांदुरबाजार

४. मोशी . मोर्शी, वरुड

५. धारणी धारणी, चिखलदरा

६. चांदुर रेल्वे चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे, तिवसा

२००१ च्या जनगणनेनुसार अमरावती जिल्ह्यात एकुण ११ शहरे व १६७९ वस्ती असलेली खेडी आहेत. ग्रामीण भागाच्या विकासाकरिता एकुण १४ पंचायत समिती आहेत तर शहरी भागाच्या विकासाकरिता अमरावती व बडनेरा शहर मिळून एक महानगरपालिका आहे. परतवाडा व अचलपूर मिळून एक (अ) वर्ग दर्जा असलेली नगरपालिका आहे. शासनाने अमरावती जिल्हा प्रादेशिक मुख्यालय म्हणून घोशीत केल्याने प्रशासकीय दृष्ट्या अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यांचे विभागिय आयुक्तालय अमरावती याठिकाणी आहे.

या जिल्ह्याच्या उत्तरेस सातपुडा पर्वत, पूर्वेस व पश्चिमेस पसरलेला आहे. वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, अचलपूर, चिखलदरा, धारणी, दर्यापूर ह्या तहसिल आहेत. त्यापैकी चिखलदरा व धारणी ह्या तालुक्याच्या बराचसा भाग डोंगराळ व घाट जंगलाचा आहे. पूर्वेकडे वर्धा नदी ही अमरावती जिल्हा व वर्धा जिल्ह्याची सीमारेशा बनलेली आहे.

या जिल्ह्याचा बहुतेक भाग लाव्हा रसाचा बनलेला आहे. येथील जमीन काळी कसदार आहे. ब्लॅक कॉटन सॉईल या नावाने ती ओळखली जाते.

'अमरावती जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ६५.५० टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. तर नागरी भागात ३४.५० टक्के एवढी लोकसंख्या आहे. नागरा भागाची सर्वात जास्त लोकसंख्या अमरावती या जिल्हा मुख्यालयाची असून ती एकुण नागरी लोकसंख्येच्या ६१.०८ टक्के इतकी आहे. तर सर्वात कमी नागरा लोकसंख्या चिखलदरा या शहराची असून ती ००.५३ टक्के इतकी आहे.'

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यामध्ये दर हजार पुरूशांमागे स्त्रीयांचे प्रमाण ९३८ आहे. तर महाराष्ट्र राज्यामध्ये हे प्रमाण हे प्रमाण ९२२ आहे. ग्रामीन भागात हे प्रमाण ९४० तर नागरी भागात हे प्रमाण ९३४ इतके आहे

Smt. K. G. M. M. Daryapur

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 281 (CCLXXXI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

'जिल्ह्यातील अनुसूचित जातींची लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या १७.१ टक्के इतकी आहे. तर अनुसूचित जमातींचे प्रमाण, १३.७ टक्के इतके आहे. महाराष्ट्राच्या अनुसूचित जाती व जमातींच्या लोकसंख्येशी तुलना केल्यास टक्केवारी अनुक्रमे ०४.५२ टक्के व ०४.१६ टक्के आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंखेशी तुलना केल्यास हिच टक्केवारी अनुक्रमे ०.४६ टक्के व ०.३७ टक्के आहे

जिल्ह्यातील एकुण लोकसंख्येशी तुलना करता जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण ८२.५ टक्के असून साक्षर लोकसंख्येमध्ये ८८.०९ टक्के एवढे पुरुश तर स्त्रियांचे साक्षरतेची टक्केवारी ७५.०७ टक्के एवढी आहे. महाराष्ट्राशी तुलना केल्यास ती अनुक्रमे ८६ टक्के व ६७ टक्के एवढी आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळातील अमरावतीतील राजकीय पक्ष पुढीलप्रमाणे होत. — १. कॉंग्रेस समाजवादी पक्ष, २. रॅडीकल डेमोक्रेटिक पार्टी, ३. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, ४. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, ५. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, ६. फॉरवर्ड ब्लॉक, ७. हिंदु महासभा, ८. मुस्लीम लिग

या पक्षाची स्थापना इ.स.१८८५ मध्ये मुंबईत झाली पहिल्या, दुसऱ्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाला व—हाडातील कोणताही प्रतिनिधी उपस्थित नव्हता. परंतु इ.स.१८८७ मध्ये मद्रास येथे तिसरे अधिवेशन श्री.बद्रद्दीन तैय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली भरविले गेले तेव्हा मात्र 'व—हाड सार्वजनिक सभा तर्फे सात सदस्यांचे एक प्रतिनिधीमंडळ पाठविले होते. त्यामये श्री. रंगनाथ नरसिंह मुधोळकर, श्री. मोरोपंत जोशी, श्री.बळवंतराव खोत व देवराव विनायक डिगंबर यांचा समावेश होता.

वऱ्हाडातील कॉंग्रेसचे मुख्य म्हणून श्री. रं. न.मुधोळकर व मोरोपंत जोशी होते. अमरावतीतील कॉंग्रेसच्या कार्याला शाखेला इ.स.१८८८ पासून झाली. 'इ.स.१८९७ मध्ये अमरावती येथे कॉंग्रेसचे अखिल भारतीय तेरावे अधिवेशन भरविल्या गेले होते. या अधिवेशनाची फलनिश्पत्ती म्हणजे त्यामुळे राष्ट्रीय जागृतीचा पाया भक्कम झाला. याच अधिवेशनात टिळकांच्या चित्रावरुन जहाल व मवाळ असे दोन गट अमरावतीतही झाले.

कॉंग्रेसने गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशाच्या स्वातंत्र्यासाठी जी अनेक अंदोलने केलीत, त्यामध्ये १९२१—असहकार आंदोलन, १९३०—कायदेभंगाची चळवळ. १९४०—४१—वैयक्तिक सत्याग्रह, १९४२—भारत छोडो आंदोलन ही आदोलने केल्या गेली. त्यात अमरावतीतील कॉंग्रेसच्या शाखेने रं. न. मुधोळकर व मोरोपंत जोशी यांच्या सहकार्याने मोठी कामगिरी बजावली होती. त्याचाच परिणाम असा झाला की, पुढे व—हाडातील स्वातंत्र्या चळवळीचे अमरावती हे प्रमुख केंद्र बनले.

श्री. र. न. मुधोळकर हे कॉंग्रेसच्या औद्योगिक विभागाचे मुख्य असल्यामुळे त्यांच्या अथक प्रयासाने व—हाडात औद्योगिक चळवळीचा पाया रचल्या गेला. त्याचप्रमाणे विदर्भ महाविद्यालय हे त्यांच्याच प्रयत्नाचे फळ होय.

या पक्षाची स्थापना १९३४ मध्ये झाली. पक्ष स्थापनेत जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, डॉ. राम मनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन यांचा सहभाग होता. १९४२ च्या आंदोलनात या गटाने फार महत्त्वाचे कार्य केले.

'अमरावतीत समाजवादी पार्टी कार्य करीत होती. त्यामध्ये श्री. बापुसाहेब भोदू, माधवराव देशमुख, अनगळ वकील, नारायणराव वाटाणे, गंगा बिसनजी सिकची, श्री.पांडे वकील इत्यादी कार्यकर्ते कार्य करीत होते. १९५२ च्या सार्वजनिक निवडणुकीत या पक्षाने जिल्हा व शहर शाखेने


G. M. M. V. Smt. K. Daryapur

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 281 (CCLXXXI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

सहभागी होवून संसद विधानसभेच्या निवडणुकीत श्री.पांडे याना तर संसदेसाठी सिकची यांना उमेदवारी दिली. पुढे श्री. रघुनाखमल कोचर, अनंतलाल दम्माणी, विरसेनजी स, व्यंबकराव गुंढाळे अशी अनेक कार्यकर्ते मंडळी या पक्षाशी जोडली गेली. या पक्षाने अमरावतीत झोपडपट्टीवासीयांच्या समस्या, कामगाराच्या समस्या, प्रवासीच्या समस्या इत्यादींच्या समस्या, संघटना स्थापन करुन सोडविण्याचा कसोसीने प्रयत्न केला. या पक्षाने अमरावतीस अनेक सामाजिक व राजकीय आंदोलने केलीत.

विरोधी पक्ष काढून तो वाढविणे हे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यावश्याक आहे, असे हा पक्ष मानतो.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या प्रश्नावरुन कॉंग्रेसशी मतभेद होवून मानवेंद्रनाख रॉय यांनी डिसेंबर १९४० मध्ये डेहराडून या ठिकाणी रॅडीकल डेमॉक्रेटिक पार्टी (जहाल लोकपक्ष) या राजकीय पक्षाची स्थापना केली.

या पक्षाचे महाराष्ट्र शाखेचे संघटक भाई ह.रा.महाजनी यांनी अमरावतीत शाखा असावी यासाठी या पक्षाची विचारसरणी व मानवेंद्रनाख रॉय यांनी माहिती देण्यासाठी सात दिवसाचा एक अभ्यासवर्ग घेतला. त्यानंतर त्याच सभेत २१ मे १९४३ रोजी अमरावतीत या पक्षाची स्थापना करण्यात येवून सदाभाऊ सराफ, वसंतराव मोंड, वसंतराव गोडबोले, मनोहर कांत, काका पंडीत, डॉ.विधाते, बाबासाहेब पळसोतकर, आनंदराव लढके, बाबासाहेब वहाटे, शंकरराव शेळके, तात्यासाहेब पितळे, श्रीमती रमाबाई साने वगैरे मंडळी उपस्थित होती.

पक्षाचे साप्ताहिक 'इंडीपेंडंट इंडिया' हे इंग्रजी साप्ताहिक मोठ्य संख्येने त्यावेळी शहरात खपत असे. नंतर या पक्षाचे विसर्जन समाजवादी पक्षात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केले गेले.

१९१९ साली कॉ.लेनीन यांनी स्थापन केलेल्या 'कॉम्युनिस्ट (थर्ड) इंटरनॅशनल (कॉमीटन) या जागतिक संस्थेची शाखा भारतीय कम्यूनिस्ट पार्टी म्हणून भारतात काम करीत असे. या पक्षाचे संपूर्ण भारतात कामगार व शतकारी थोडे का होईना सभासद होते. परंतु पक्षाप्रती त्यांनी सर्वस्व वाहिलेले होते.

'अमरावती जिल्ह्यात या पक्षाचे ज्या ठिकाणी गिरण्या होत्या त्या ठिकाणी कामगार या पक्षाचे सभासद होते.' बडनेरा, अचलपूर येथील गिरणी कामगारांच्या संघटना या पक्षात सक्रिय होत्या नेरपिंगळाई– भाई शेशराव घाडगे हे त्यामधील अग्रणी नेते होते. 'अचलपूर गिरणी कामगाराच्या समस्येबाबत आंदोलनात तर त्यांना सहा महिने शिक्षा झाली होती.

अमरावती येथील श्री.माधवराव देशपांडे हे मुंबईत असतांना त्यांनी तेथील गिरणी कामगारांत संप घडवून आणल्यामुळे संयुक्त प्रांत सरकारणे त्यांना हद्दपार केल्यामुळे ते अमरावतीत परत आले.

वसाहतवादातून मुक्तीसंघर्श त्याचप्रमाणे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढा देणाऱ्या संस्था व विविध कामगार संघटना यांची आघाडी तयार करण्याचे धोरण या पक्षाने स्विकारले होते. माधवराव देशपांडे यांनी यांनी स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कार्यात अग्रभागी असलेल्या कॉंग्रेस पक्षात प्रवेश करुन अमरावती जिल्हा कॉंग्रेस, कमेटिच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात 'किसान परिषदा' घेवून ठिकठिकाणी शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी १९३८–३९ मध्ये अमरावतीत टांगा–युनीयन' आणि गिट्टी फोडणाऱ्या मजुरांकरिता 'मेटल कामगार युनियन' व बडनेरा आणि अचलपूर या ठिकाणी गिरणी कामगारांच्या संघटना स्थापन केल्या.



Smt. K. G. M. M. * Daryapur *

'Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 281 (CCLXXXI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

(167)

'अमरावती जिल्ह्यातील कम्युनिस्ट पार्टीत राष्ट्रीय सहभाग देणारे सुदामकाका देशमुख, डब्ल्यु.एन.देशपांडे, भाई सावरकर, श्री.कदम, श्री. देवराव, विश्वासराव देशमुख आणि लक्ष्मणसिंह परिहार (दर्यापूर) होते.'

पार्टीचा प्रभाव हळुहळु कामगार संघटनांमध्ये विद्यार्थी संघटनांमध्ये आणि किसान संघटनांमध्ये वाढू लागला होता. शिक्षक, भंगी, मिल कामगार, शेतकऱ्यांसाठी या पार्टीने आपली आंदोलने सुरु केली होती. अचलपूर, गिरणीची कामगार संघटनेची जबाबदारी सुदामकाका देशमुख यांचेकडे तर बडनेरा गिरणी कामगार संघटनेची जबाबदारी कॉ. दिवाणजी यांचेकडे सोपविली होती.

'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे इ.स. १९४२ मध्ये 'भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची' स्थापना केली. त्यानंतर अल्पकालावधीतच अमरावतीत या फेडरेशनच्या शहर व जिल्हा शाखा स्थापन झाल्या. १९५७ पर्यंत फेडरेशन अस्तित्त्वात होती नंतर तिचे रुपांतर 'रिपब्लीक पार्टी' या राजकीय पक्षात करण्यात आले.

१९३९ मध्ये रायगड (बिहार) याठिकाणी काँग्रेसचे अधिवेशन सुरु असताना सुभाशचंद्र बोस यांनी त्याठिकाणी काही अंतरावर 'अखिल भारतीय असहकार परिषद घेतली होती. त्याच परिषदेत त्यांनी 'अखिल हिंद फॉरवर्ड ब्लॉक ची स्थापना केली. त्यामुळे त्यांच्या अनुयायांनी संपूर्ण देशात 'फॉरवर्ड ब्लॉक' ची स्थापना केला.

अमरावतीस डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. सोमण. डॉ. भोजराज, श्री.राजाभाऊ बारलींग, श्री. बाळासाहेब मराठे इत्यादी मंडळींनी 'फॉरवर्ड ब्लॉक' ची स्थापना केली. त्या पक्षाच्या वतीने मोटार कामगारांची संघटना अमरावतीत डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी स्थापन केली.

बाबासाहेब खापर्डे, पं. मदनमोहन मालवीय व अ.वा. नवाडे यांच्या मार्गदर्शनात इंद्रभुवन थियटरमध्ये ३ सप्टेंबर १९२३ रोजी हिंदु महासभेच्या स्थापनेकरिता सभा आयोजित करुन एक पोटसमिती स्थापन करण्यात आली.

पं.मदनमोहन मालवीय यांना हिंदु महासभेचे संस्थापक समजल्या जात होते. विदर्भात हिंदु महासभा, डॉ. बा.शी.मुंजे यांनी स्थापन केली. 'हिंदु हिंदु हिंदुस्थान' हा नारा हिंदु महासभेचा होता. राष्ट्रीय स्वाभिमान, राष्ट्रीय स्वत्व, राष्ट्रीय चरित्र, अस्पृश्यता निर्मलन. सामाजिक सुधारणा, अखंड हिंदुस्थान, समान कायदा, राष्ट्रीय हिंदकरण महिलांची प्रगती, शस्त्र निर्मिती, महिलांची प्रगती, उद्योगधंद्याचा विकास, लष्करी शिक्षण, लष्कराचे वैज्ञानिकीकरण ह्यावर हिंदुमहासभेचा भर होता.

'इ.स.१८९७ साली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाने अमरावती जिल्ह्याला भारतीय राजकारणात खऱ्या अर्थाने ओळख निर्माण करून दिली.' तसाही पूर्वीपासून या जिल्ह्याला एक विशिष्ट स्वरुपाची राजकीय वैचारिक परंपरा लाभली आहे. भारतातील अग्रणी राजकीय नेत्यांनी जिल्ह्याला वेळोवेळी भेटी देवून राजकीय सहभागीकरण वाढविले. त्यामध्ये प्रामुख्याने लोकमान्य टिळक, सावरकर इत्यादी. जिल्ह्यातील अनेक राजकीय नेत्यांची प्रसंशा देखील पं. नेहरुना केली आहे. विविध राजकीय पक्षाची निर्मिती. त्यांनी घेतलेली अधिवेशने आंदोलने, कार्यक्रम या माध्यमातून अमरावती जिल्ह्यातील राजकीय नेत्यांची कामगिरी अतुलनीय होती, असे दिसून येते. जिल्ह्यात ज्या राजकीय किर्तीमान व्यक्ती होत्या त्यांचा सक्षिप्त राजकीय सारांश खालीलप्रमाणे सांगता येईल.

सर हा किताब आपल्या बहुविविध कामगिरीमुळे मिळालेले सर मोरोपंत जोशी हे अमरावतीतील पहिले व्यक्ती. ते अत्यत स्पष्ट वक्ते होते – इ.स.१८९७ मध्ये अमरावतीत

Smt. K. G. M. M. V. Daryapur

भरलेल्या काँग्रेसच्या स्वागत समितीचे ते सदस्य राहीले. रायफल क्लबचेही सदस्य होते. तरुणांना आत्मरक्षणार्थ बंदुक चालविण्याचे शिक्षण ते देत असत. बालविवाह प्रथेविरुद्ध त्यांनी मोठे कार्य केले आहे. १९१४ साली पुणे या ठिकाणी भरलेल्या 'सामाजिक परिषदेचे ते अध्यक्ष होते. इ.स.१९२० मध्ये ते मध्यप्रांत व–हाडमध्ये ते गृहमंत्री बनले. इ.स. १९३७ मध्ये त्यांना सांगलीचे दिवाण बनविल्या गेले. त्यांच्या उत्तम प्रशासनामुळै सांगलीला त्यांनी उकृष्ट संस्थान बनविले होते. त्या संस्थानात त्यांनी अनेक सुधारणा घडवून आणल्या होत्या.

इ. स.१८८७ मध्ये मद्रास या ठिकाणी भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाला अमरावतीतून जे तीन प्रतिनिधी पाठविण्यात आले होते त्यापैकी श्री.बळवंतराव खोत हे एक होते.' श्री. खोत कॉटन एक्सपर्ट म्हणून प्रसिद्ध होते. श्री. मुधोळकर व मोरोपंत जोशी यांचे सोबत सहकारी म्हणून त्यांनी काम केले होते. अमरावती नगरपालीकेचे सदस्य म्हणून त्यांची इ. स. १८८४–८५मध्ये नियुक्ती झाली होती. व–हाडात काँग्रेसच्या स्थापनेपासून जी मंडळी अग्रेसर होती. त्यापैकी खोत हे एक होत. त्याकाळी अमरावतीतील काही झोपड्यांना आग लागून बेचिराख झाल्या होत्या. त्यामुळे अनेक कुटुंबे रस्त्यावर आली होती. तेव्हा श्री.खोत यांनी आपल्या शेतीवर त्या कुटुंबियांना राहण्यासाठी जागा दिली होती. तो आत्ताचा हमालपूरा भाग होय. त्याचाच काही भाग खोत यांनी डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांनी स्थापन केलेल्या जगदंबा कुष्ठधामाला दान दिला होता. काही भाग त्यांनी बेरार एज्युकेशन सोसायटिला दान दिला होता.

अमरावती नगरपालिकेत कित्येक वर्ष सभासद राहीलेले व उपाध्यक्ष राहीलेले नानासाहेब यांना १९१४ मध्ये सरकारने रावसाहेब व १९२१मध्ये दिवाणबहादूर ही पदवी बहाल केली. १९२१ मध्येच सरकारने त्यांना मध्यप्रांत व–हाड कायदेमंडळाचे सभासद नेमले होते. 'कारोनेशन गार्डन' हल्लीचा कस्तुरबा गार्डन हा सुंदर बगीचा शहराच्या मध्यभागी त्यांच्याच पुढाकाराने तयार करविला आहे.

अखिल भारतीय काँग्रेसच्या जहाल गटातील उमदं नेतृत्व म्हणजे श्री भाऊसाहेब असनारे होते. जालियनवाला बाग हत्याकांडाविशयी जी शोकसभा झाली होती तीत मुख्यभाषण श्री. असनारे यांनी केले होते. हंटर कमिटी च्या माध्यमातून इंग्रजांनी जे जुलमी कायदे राज्यात आणले होते. त्या विरोधात श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली जी निशेध सभा आयोजित केली होती त्याचा ठराव श्री असनारे यांनी मांडला होता. हिंदू विधवाच्या चरित्याविशयी कलकत्याच्या चिकनी नामक वृत्तपत्राने केलेल्या अन्याय विधनाचा निशेध करण्याकरिता जी सभा आयोजित केली होती त्यात त्यात श्री. असनारे यांनी प्रभावी भाशण केले होते.

१९२१ मध्ये भारतात जी असहकाराची चलवळ झली त्यामध्ये न्यायालयांवर बहिष्कार घालणाऱ्यांमध्ये श्री. असनारे अग्रणी वकील होते.

अमरावती नगरपालिकेचे उपाध्यक्ष, जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष नागपूर प्रांतीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष व इ.स.१८९७ मध्ये अमरावतीत भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून खापर्डे होते. लोकमान्य टिळकांचे निश्ठावंत सहकारी व जहाल गटाचे अमरावतीचे नेतत्व त्यांनी केले. होमरुल लिग चे प्रतिनिधी म्हणून माँटेग्यू सुधारणासंबंधी ते इंग्लंडला गेले होते. विदवत्ता, रसिक, उकृष्ट अभिनय या गुणांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वांची छाप पडत असे. अमरावतीतील सर्वच प्रकारच्या सार्वजनिक संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध होता. राष्ट्रीय आंदोलनात महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या क्रांतीकारकांना त्यांनी फार मोलाचे सहकार्य व मदत केली. त्यांच्या उकृष्ट वकिलीचा ज्ञानामुळे इंग्रज सरकारला अनेक कायद्यामध्ये बदल किंवा रद्द

करावे लागले. गांधीवादातील राजकीय अव्यवहार्यता त्यांना मान्य नसल्यामुळे टिळकांच्या मृत्युनंतरही त्यांनी जहाल गटाचे कार्य सोडले नाही. समतोल राजकीय विचाराचे धनी म्हणून त्यांना समजले जात असे. शहरातील अनेक नाट्य कलाकारांना आश्रय देण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता.

दादासाहेब खापर्डे यांच्या प्रेरणेने सरुवातीला शिक्षक व नंतर सार्वजनिक चळवळास वीर वामनरावांनी सुरुवात केली. बलुता विरोधी मोहीम, सरकार शाखांवर बहिश्कार, मजुरांकरिता आंदोलने, नाट्यलेखन अशा विवीध भुमिका त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात केल्यात. विदर्भ काँग्रेसचे सर्वाधिकारी ही वामनराव दादा बनले. शेंदरजनाघाट या ठिकाणी विदर्भ राजकीय परिषदेसाठी डॉ. हार्डिकर, स्वामी सहजानंद व स्वतः पं. जवाहरलाल नेहरू आले होते. त्या परिषदेची व्यवस्था व अफाट जनसागर पाहून आयोजकांची पं. नेहरूंनी मुक्तकंठाने स्तुती केली होती.

वीर वामनराव दादा लोकसभेचे आणि विधानसभेचे सदस्यहोते. त्यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महत्वाचे योगदान होते. २१ मार्च १९५६ रोजी श्रीमतल इंदिरा गांधी अमरावतीस आल्या होत्या. तेव्हा दादांनी त्यांना आशिर्वाद दिला होता की, 'तुम्ही भारताच्या सर्वश्रेश्ठ नेत्या व्हाल' वीर वामनरावांच्या रजत जयंती निमित्त कार्यक्रमाला राजेंद्रप्रसाद आले होते. यावरुन दादांच्या राजकीय, सामाजिक कार्याचा उल्लेख किती उच्च दर्जाचा होता, हे दिसून येते.

सतत मनात शिक्षणाचा ध्यास असल्यामुळे दर्यापूर येथे प्रबोधन विद्यालयाची स्थापना केली. ते मध्यप्रांत व व—हाड लॅजेस्टिक कौन्सिलचे तीन वेळा आमदार राहीले. केंद्रीय विधानमंडळात सभासद होते. १९५२ ते १९६४ मध्ये राज्यसभेचे खासदार राहीले. मध्यप्रांतात तीन वेळा आमदार 'संयुक्त राश्ट्रसंघात भारताचे जे प्रतिनिधी १९४६ साली गेले होते तेव्हा अण्णासाहेब देशमुख त्यामध्ये प्रतिनिधी होते.'

स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री पद भूषविणारे डॉ. पंजाबराव देशमुख होते. हरिजनांकरिता, अस्पृश्यांकरिता पिण्याचे पाणी असो की, अंबादेवीच्या मंदिरात प्रवेश असो यासाठी नेहमी डॉ. देशमुख आग्रही राहीले. 'त्यांच्याच प्रयत्नाने अंबादेवीच्या मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात जी आंदोलनाची योजना तयार झाली होती ती डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या मध्यस्तीने सुटू शकली व अस्पृश्यांना मंदिराचे दरवाजे खुले झाले.' शिक्षण, खेळ व क्रिडा यासाठी अमरावतीत श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली.

इ.स.१९२५ ते १९३८ या कालखंडात दोन वेळा अण्णासाहेब कलोती अमरावती नगरपालिकेचे नगराध्यक्ष होते. अमरावतीच्या राजकारणाला नवी दिशा देण्याचे काम श्री. कलोती यांनी केले. कतबगारीवरही निवडणुका जिंकता येवू शकतात हे त्यांनी प्रथमच दाखवून दिले. मालटेकडिचे सौंदर्गीकरण, इर्विन चौक, द्विभाजक कडा, शिवछत्रापतीचा पुतडा, शहिद भगतसिंग, सुखदेव सुखदेव, राजगुरू स्वातंत्र्यविरांचे स्मारक इर्विन चौक या ठिकाणी केले. अमरावतीच्या नकाशावर हरिभाऊ कलोती हा एक मराठी, नवीन रक्ताचा व कतबगारी नेता होता.

'महाविद्यालयीन व शालेय स्तरावर आपल्या प्रभावी वक्तृत्वाने पारितोषिके मिळविलेले श्री. देशमुख अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालया. छात्रसंघाचे अध्यक्ष म्हणून १९६०—६१ मध्ये झाले. आणि तेच त्यांच्या राजकीय पर्वाची सरुवात म्हणावी लागेल.' श्री शिवाजी शिक्षण संस्थेत राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून केलेले अध्यापन इतरांसमोर आदर्श राहील असेच होते नागपूर विद्यापीठ सिनेट सदस्य, कार्यकारीणीचे सदस्य, अॅकॅडमिक कौन्सिल सदस्य सामाजिक शास्त्र



Smt. K. G. M. M. V. * Daryapur

विद्याशाखेचे अधिश्ठाता, राज्यशास्त्र अभ्यासमंडळ सदस्य अशी विविध कामगिरी त्यांनी पार पाडली. छणढअ संघटनेचे १९७३—७४ पासून २०११ पर्यंत अध्यक्षपद त्यांनी भूशवुन प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कमचारी व इतरही मुलभूत प्रश्नांची सरबत्ती विधीमंडळाच्या माध्यमातून सरकारवर केली. १९९६ मध्ये 'उकृष्ट संसदपटू' म्हणून बहुमान त्यांना मिळाला. १९८० मध्ये पदवीधर मतदारसंघातून विधानपरिषदेचे सदस्य म्हणून पहिल्यांदा निवड. विधानपरिषदेवर तिन वेळा निवड होणे ही मतदारसंघाने त्यांच्या कार्याची दिलेली पावतीच मानावी लागेल.

१. सौ.यशोदाबाई जोशी — वनिता समाज मंडळ स्थापना

२.सौ.लक्ष्मीबाई खापर्डे — महिला काँग्रेस स्थापना

३. सौ.ताराबाई पाध्ये — शारदाउद्योग मंदिर स्थापना

४. सौ.दुर्गाताई जोग — संयुक्त महाराष्ट्र आंदोलन

५.सौ.नलिनीताई लढके — दलित मित्र

६.श्रीमती चंद्राताई पटवर्धन — काँग्रेस कार्यकर्ते

७.सौ.पार्वतीबाई पटवर्धन — कुश्ठरोग्यांची सेवा

८. सौ.विमलाबाई देशमुख — माजी खासदार

९. श्रीमती कोकिळाबाई गावंडे — माजी आमदार

१०.सौ.प्रतिभाताई पाटील — माजी राष्ट्रपती

११. सौ.उशाताई चौधरी — मा.खासदार

१२. सौ.विद्या देशपांडे — मा.महापौर

१३.सौ.किरण महल्ले — मा.महापौर

१४. मालतीताई जोशी — मा.आमदार

१५. सौ.वसुधाताई देशमुख — मा.मंत्री

अमरावती जिल्ह्याला समृद्ध राजकीय वारसा लाभलेला असून जिल्ह्यातील अनेक राजकीय नेत्यांनी देश पातळीवर जिल्ह्याचे नाव मोठे केले आहे त्यामध्ये प्रामुख्याने माजी राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील, माजी राज्यपाल श्री. रा. सु. गवई इत्यादी. सोबतच राजकीय नेतृत्व करणारे जी नेते मंडळी जिल्ह्यात यामध्ये आहेत. माजी खा. अनंत गुढे, स्व. सुदाम काका देशमुख, उशाताई चौधरी, खा.आनंदराव अडसुळ, इत्यादींनी वेळोवेळी कामाची चुणुक दाखवून दिली.

जिल्ह्यात विधानसभेचे आठ मतदारसंघ आहेत. त्यामधील अग्रगण्य नेते अमरावती विधानसभा मतदार संघातून माजी आ. देविसिंह शेखावत यांनी या मतदारसंघाचे दोनवेळा प्रतिनिधीत्व केले. जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री श्री जगदिश गुप्ता व सुनील देशमुख यांनीही या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. वर्तमान स्थितीत या मतदारसंघाचे नेतृत्व आमदार रावसाहेब शेखावत करित आहेत.

दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केलेले रावसाहेब हाडोळे, चार वेळा आमदार राहीलेले श्री.प्रकाश भारसाकळे, सद्यस्थितीत प्रतिनिधीत्व करणारे आमदार अभिजित अडसुळ ह्या सर्वांनी आपल्या राजकीय कर्तृत्वाची छाप मतदारसंघावर टाकलेली दिसून येते.

अचलपूर विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे निस्पृह नेते स्व. सुदाम काका देशमुख जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भुषविणाऱ्या सौ. वसुधाताई देशमुख, विनायकराव कोरडे, दोनदा निवडून येणारे श्री.बच्चुभाऊ कडू इत्यादींनी आपल्या मतदार संघातच नव्हे संपुर्ण जिल्ह्यात राजकीय नेतृत्व केले आहे.

धारणी विधानसभा मतदार संघ हा आदिवासी बहुल लोकांचा मतदार संघ म्हणून ओळखला जातो. ह्या मतदार संघात अनुसूचित जातींची संख्या ८०च्या आसपास असल्यामुळे हा मतदारसंघ गेल्या कित्येक वर्षापासून अनुसूचित जातींकरिता राखीव मतदार संघ आहे. ह्या मतदार संघाचे नेतृत्व करणारे आदिवासी नेते श्री.पटल्या गुरुजी ह्यांनी भाजपा तर्फे दोनवेळा प्रतिनिधीत्व तर राजकूमार पटेल यांनी सुद्धा दोन वेळा प्रतिनिधीत्व केले. सद्य स्थितीत कवलराम काळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रतिनिधीत्व करित आहेत.

धामणगाव विधानसभा मतदारसंघातून जनता दलाचे नेते डॉ. पांडूरंग ढोले यांनी दोनवेळा प्रतिनिधीत्व केले. त्याचबरोबर अरुण अडसड यांनी सुद्धा दोन वेळा प्रतिनिधीत्व केले असून महाराष्ट्र राज्यात शिवसेना–भाजपा युतिच्या शासनकाळांत महत्त्वाचे समजले जाणारे विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्षपद भुषविले आहे. वर्तमान स्थितीत प्रा. विरेंद्र जगताप यांनी मतदारसंघाचे दोनवेळा प्रतिनिधीत्व केले आहे.

**संदर्भ सूचि .**


| | | | |
|---|---|---|---|
| १ | अग्रवाल,आर.सी. ; | भारतीय संविधान का विकास तथा राश्ट्रीय आंदोलन का इतिहास और भारतीय संविधान | एस.चंद एण्ड कंपनी, लि, नई दिल्ली १९९८ |
| २. | बालकृष्ण; | भारतीय संविधान के विकास का इतिहास | सुमित एल्टामाईजेस, नई दिल्ली २००८ |
| ३ | लक्ष्मीकांत, एम.; | भारत की राज्यव्यवस्था | MacpvWaw&Hill Publishing New Delhi 2008 |
| ४ | आंबेडकर, बी. आर. | जातिभेद निर्मुलन | सुगम प्रकाशन, नागपूर २००९ |
| ५ | शिंदे, वि.रा. | भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न | कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद २००३ |
| ६ | शिखरे, दा.न. (संपा); | जातीय ऐक्य | गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे, १९६१ |
| ७ | शेरे, निलकंठ | आंबेडकरवाद | सुविद्या प्रकाशन, पुणे, २०११ |
| ८ | पंडित, नलिनी; | जातीवाद आणि वर्गवाद | लोकवाङ्मय, मुंबई, १९९६ |
| ९ | पाटिल, शरद: | मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद | सुगावा प्रकाशन, पुणे, २०१० |
| १० | पाटील, मनोहर | फुले आंबेडकरी चळवळीचे क्रांतीशास्त्र | सुगावा प्रकाशन, पुणे, २०१० |
| ११ | बागडे, उमेश | महाराष्ट्राताल प्रबोधन आणि वर्ग जाली प्रभूत्व | सुगावा प्रकाशन, पुणे, २०६० |
| १२ | घोडेस्वार, देविदास (अनु.) | संविधान सभा डिबेट्स — निकाय–१ | लोकसभा सचिवालय, राईट विकर पब्लिकेशान आणि डॉक्यमेंटेशन, प्रा. लि.नागपूर, २०१३ |


Smt. K. G. M. M. * Daryapur *

2020-21

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 Online ISSN 2278-8808
AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

SRJIS
www.srjis.com

APRIL - JUNE,2021, VOL - 10, ISSUE-47

Indian Social & Research Foundation Akola ,

## ARTS COLLEGE MALKAPUR, AKOLA

( Accredited By NAAC With "B" Grade)
Department of Music & IQAC Organizing

In Collaboration with
**Sharda Sangeet - Kala Academy Indore (M.P.)**

**One Day National E- Conference**

# Contribution of Modern Technology in Globalization & Development of Music & All Interdisciplinary Subjects

**Editor-In-Chief**
**Asso. Prof. Dr. Yashpal D. Netragaonkar**
*MIT World Peace University School of Education, Kothrud, Pune*

**Editor**
**Dr. Gitali S. Pande**
*Principal , Head of Music Department, Arts College Malkapur, Akola (M.S.)*

**Co- Editor**
**Dr. Sunil B. Patake**
*Department of Music Arts College Malkapur, Akola (M.S.)*

Principal
(Dr. A.R.Choukhande)
S... okilabai Gawande Mahila Mahavidyalaya, Daryapur, Dist.Amravati

**SCHOLARLY RESEARCH JOURNALS**
*S. No. 5+4/5+4, TCG'S, Saidatta Niwas, D-wing, Ph- II, 2nd Floor, F. No. 104, Nr. Telco Colony & Blue Spring Society, Dattanagar, Jambhulwadi Road, Ambegaon (BK), Pune - 411046.*
*Website: www.srjis.com*

**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL SPECIAL ISSUE APR-MAY, 2021, VOL- 8/65*

# मराठी भाषेच्या जागतिकीकरणामध्ये व विकासामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे योगदान

**प्रा. डॉ. हरिदास देविदास आखरे**
*सहायक प्राध्यापक, श्रीमती कोकीलाबाई गावंडे महिला महाविद्यालय दर्यापूर जिल्हा अमरावती*
*मोबा. ७५८८५६६४००, E-mail hdakhare@gmail.com*

**Abstract**

*मराठी भाषा ही शतकानुगणिक अनेक टप्प्यावर काळानुरूप बदलत गेलेली आहे. प्राचीन कालखंडामध्ये तिचे स्वरूप आशय व शैलीच्या रूपामध्ये वैविध्यपूर्ण होते. मध्ययुगीन कालखंडामध्ये ती अधिक सकस व कसदार बनत गेली. तिच्या विविध रूपांचे पदर हे आपल्याला भाषेच्या काव्य, कथा निमित्तानं बोली वेगवेगळ्या शैलीच्या रूपानं आजही महाराष्ट्रामध्ये व महाराष्ट्राबाहेर अवघ्या भारतातच वेगवेगळ्या स्वरूपात पाहायला मिळते. शिलालेखांची भाषा, अज्ञापत्रा ची भाषा बखरी मधली भाषा, मोडी लिपी मधली भाषा सकळा व सुंदरा यांची भाषा या सगळ्या स्वरूपामध्ये नटलेली आहे. तिचं वैविध्य जर आपण तपासून पाहिलं तर त्यामध्ये आपल्याला एक वेगळा थाट व बाज पाहायला मिळतो. जेव्हा वेगवेगळ्या प्रांतांच्या भाषेचा पदर विणला गेला, तिची सुंदरता अधिकच खुलत गेली. ही मराठी भाषा आधुनिक कालखंडामध्ये तिचे वेगळेपण घेऊन आणि भाषाशुद्धी चळवळ, भाषा अभ्यासक यांनी त्यामध्ये विविध प्रयोग केलेले दिसतात. जॉर्ज गिरसन यांच्या लिंगविस्तिक सर्वे ऑफ इंडिया कालखंडाचा विचार केला तर जग व विज्ञान प्रगत होत गेले माहिती व तंत्रज्ञानाचे युग पुढे आले.*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

**प्रस्तावना -**

माहिती तंत्रज्ञानाने या भाषेला अधिक प्रगल्भ केले आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा वापर करून तिचं वेगळेपण जोपासण्यासाठी एक आगळावेगळा प्रयोग सुद्धा केला आहे. विज्ञान युगाचा विचार केला तर आज संगणकामध्ये मराठी आलेले आहे. मोबाईल मध्ये मराठी आलेली आहे. ट्विटर ची भाषा मराठी आहे. सोबतच जर पेजर सह सर्व मल्टिमीडिया माध्यमांची भाषा मराठी आलेली आहे. आज गूगल युनिकोड या लिपीने तर शासकीय सर्व कागदपत्र संपादन करण्याचा एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आज न्यायालयाची भाषा मराठी आहे. बँकेच्या व्यवहाराची भाषा मराठी आहे. एवढेच काय तुम्ही एमपीएससी यूपीएससी च्या मुलाखती सुद्धा मराठीमध्येच होत असतात हा प्रादेशिक भाषांचा आणि विशेषता मराठी गौरव आहे.

संत ज्ञानेश्वरांनी

*"माझा मराठाची बोलू कौतुके/ परी अमृतातेही पैजा जिंके"*

असा आशावाद या मराठी माय मराठी कडून मांडला होता. मराठी भाषा अमृताची पैज लावण्याचं काम काम करत आहे.

**बीज शब्द -**

संगणक, आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान, जागतिकीकरण, भाषा भगिनी, प्रमाणभाषा, बोलीभाषा ,भाषा अभ्यासक, दुभा ष क, वैद्यकीय भाषा, तंत्रज्ञानाची भाषा, सहित्याची भाषा.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

Principal
(Dr. A.R.Choukhande)
Smt. Kokilabai Gawande Mahila
Mahavidyalay, Daryapur,
Dist.Amravati

**१. मराठी भाषेचा इतिहास-**

कोणत्याही भाषेचा इतिहास हा तिच्या वैविध्यपूर्ण स्वरूपावर अवलंबून असतो. ती भाषा वेगवेगळ्या भाषावर प्रांता मध्ये तिने आपली रूप बदलली होती, त्या भाषांचा समावेश त्यामध्ये होत असतो बोलीभाषा ही ग्रामीण, आदिवासी, गावाकडून आलेली भाषा असेल परंतु तिच्यामध्ये अस्सलपणा, सच्चेपणा, माधुर्य हे सगळे पाहायला मिळते. मराठी च्या बोलींचा विचार केला तर अहिराणी, वऱ्हाडी, डांगी, कोकणी, हळवी, नागपुरी असा ति च्या भाषा भगिनी आहेत. या भाषा भगिनींना सोबत घेऊन तिचा विकास हा सातत्याने होत आहे. अहिराणी मध्ये लिहीत असलेल्या बहिणाबाई, आपला अहिराणी बाज व्यक्त करतात. परंतु सोबतच्या प्रमाण मराठीला समृद्ध करीत असतात. वर्हाडी मराठी मध्ये लिहीत असलेले विठ्ठल वाघ किंवा असंख्य कवी किंवा लेखक हे त्या माय मराठीला समृद्ध करत असतात . कोकणी असेल ह लबी असेल, नागपुरी असेल त्या सगळ्या भाषा भगिनी मिळून प्रमाण मराठीला विविध शब्दांचा खजाना देण्याचं काम या भाषा भगिनींनी केला आहे.

मराठी भाषा ही अपभ्रंश यामधून निर्माण झाली. तर काही भाषा अभ्यासकांच्या मते मराठी भाषा ही संस्कृतपासून झालेली आहे. या वादात न पडता मराठी उच्चार यातून मराठी आणि लोक व्यवहार पार पडावा यासाठी मराठी ही भाषा पुढे आली आहे. हा विचार संमत होतो. आज जागतिकीकरणाच्या युगा मध्ये मराठी भाषा ही साता समुद्रा कडे पोहोचल्याचे आपल्याला पाहायला मिळते. भारतातील अमेरिकेमधील स्थाईक झालेले एखादं कुटुंब अमेरिकेमध्ये आपल्या कुटुंबात बोलताना मराठी भाषा बोलतो .मग त्यावर ती अमेरिकन उच्चाराचा प्रभाव जरूर असेल परंतु तो त्याठिकाणी मराठी संस्कृती टिकवून ठेवतो. वि दा सावरकरांनी जी भाषाशुद्धीची चळवळ चांलावीली होती ती आज किती महत्त्वपूर्ण ठरते असे आपल्याला पाहायला मिळते. मराठीचा ह्या प्रवासामध्ये गुजराती, अरबी, स्पेन, इंग्रजी, पोर्तुगीज या सगळ्या भाषांमधून वेगवेगळ्या गोष्टींना व शब्दांना आपल्या भाषेत सामावून घेऊन तिच्यामध्ये एक वेगळेपण निर्माण करण्याचं काम करते. इतर भाषांचा मराठी भाषेवर झालेला परिणाम हाही लक्षात घेणे गरजेचे आहे.

**२. आधुनिक तंत्रज्ञान व मराठी भाषा -**

मराठी समाजात तंत्रज्ञानाविषयी मोठी गैरसमजूत आहे. तंत्रज्ञानाचे मराठीवर विपरीत परिणाम होतील, मराठीच्या अस्तित्वाला धोका पोहोचेल अशी भीती मराठी समाजाला आहे. अशा वेळी एक गोष्ट दुर्लक्षिली जाते की, मानवी भाषा व तंत्रज्ञान यांचे एक अतूट नाते आहे. भाषेचा विकास हा तंत्रज्ञानाच्या साहाय्याने होतो आणि तंत्रज्ञान जसे विकसित होईल, तशी भाषाही विकसित होत जाते. भाषा व तंत्रज्ञान यांचे संबंध हे आशय व अभिव्यक्तीच्या साधनांमधले संबंध आहेत. पण तंत्रज्ञान म्हटले की, आपल्याला एकदम संगणक व त्यावरील व्यवहारच आठवतात आणि मग गैरसमजांना सुरुवात होते.

अगदी प्रारंभिक काळात मानव आपल्या भावना हातवारे करून व चेह-यावरील हावभावांनी व्यक्त करीत होता. म्हणजे त्याच्या त्या 'अ-बोली'साठी हात व चेहरा ही साधने होती. नंतर तो हुंकार देऊ लागला, आरोळी ठोकू लागला. म्हणजे त्याला गळ्यातील 'स्वर-यंत्रा'चे ज्ञान झाले. येथे आपण 'यंत्र' हा शब्द योजला आहे. जेथे 'यंत्र' येते, तेथे 'तंत्र'ही

Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

Smt. K. G. M. M. V. ...pur

येते. त्याचे 'ज्ञान' येते. स्वरयंत्राचे तंत्रज्ञान विकसित होत गेले तशी मानवाची भाषा 'बोलकी' झाली. माणूस बोलू लागल्यावर त्याने आपल्या भाषेसाठी 'वर्णमाला' तयार केली. 'लिपी' तयार केली. ही वर्णमाला व लिपी हे एक प्रकारचे तंत्रज्ञानच आहे. या वर्णमालेच्या व लिपीच्या साहाय्याने भाषा आणखी विकसित होत गेलेली दिसते. त्यातून व्याकरण तयार झाले, शब्दकोश तयार झाले. 'उच्चारणा'चे तंत्रज्ञान विकसित होत गेले, त्यातून 'छंद', 'अलंकार' तयार झाले

**३. मराठी भाषेची जागतिकीकरणात मजल -**

वेद, पुराणे मुखोद्गत करून ती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली जात होती. म्हणून वेद, पुराणे स्मृतीत ठेवण्यासाठी काव्य व उच्चारण-शास्त्राशी संबंधित असे एक स्मरणात ठेवण्यासाठीचे तंत्रज्ञान तयार झाले. आधुनिक काळातील संगणकात माहिती साठवण्याचे जे तंत्रज्ञान आहे, तसेच हे मेंदूत माहिती साठवण्याचे तंत्रज्ञान होते. मराठीची वर्णमाला खूपच शास्त्रोक्त पद्धतीने तयार केलेली आहे. उच्चारासारखे लेखन करण्याचे, जोडाक्षरे वापरण्याचे सामर्थ्य मराठीच्या वर्णमालेने आपल्याला दिलेले आहे. त्याच्यामागे मोठे शास्त्र दडलेले आहे. जोडाक्षरांचा वापर व उच्चारासारखे लेखन करणारी वर्णमाला यामुळे मराठीला प्रगल्भ देणगी मिळालेली आहे. अनेक भारतीय भाषांमध्येही जोडाक्षरे नाहीत. पंजाबीत 'जितेंदर' असे लिहिले जाते, कारण त्या भाषेत मराठीसारखी सोय नसल्याने 'जितेंद्र' जसा जोडाक्षरी शब्द लिहिता येत नाही. लिपीचा शोध लागल्यावर प्रत्यक्ष लेखन सुरू झाले. शिलालेख, भूर्जपत्रे, ताम्रपट यांवर लेखन सुरू झाले. कागदाचा शोध लागला. टाईपरायटर आला. गुटेनबर्गने छपाईयंत्राचा शोध लावला आणि वर्तमानपत्रे, पुस्तके प्रकाशित करता येऊ लागली. भाषा अजून विकसित झाली.

या सगळ्यांचा विचार केला की लक्षात येईल, मानवाने आपल्या अभिव्यक्तीसाठी भाषेमागचे तंत्रज्ञान सतत विकसित करीत नेलेले आहे. हे तंत्रज्ञान भाषेच्या अभिव्यक्तीला इतके लगटून गेलेले आहे की, ते 'तंत्रज्ञान' आहे हेच आपण विसरून गेलो. ज्या भाषेमागचे तंत्रज्ञान विकसित केले गेले, ती ती भाषा विकसित होत गेली आणि ज्या भाषेमागे तंत्रज्ञान विकसित रूपात उभे राहिले नाही, ती ती भाषा लोप पावली असे दिसून येते. भाषेमागच्या तंत्रज्ञानाच्या विकासाच्या टप्प्यावरचे एक साधन म्हणजे संगणक व माहिती तंत्रज्ञान आहे, हे लक्षात घेतले तर कोणतेही गैरसमज अपण करून घेणार नाही.

**४.मराठीपुढचे आव्हान _**

तंत्रज्ञानाचे आव्हान नाहीच. प्रारंभिक काळापासून मानवाला अभिव्यक्तीसाठी जी साधने मिळाली व त्याचे तंत्रज्ञान तयार झाले, ते सर्वत्र सारखेच होते. आतापर्यंत त्याच तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मराठीचा विकास होत आलेला आहे. आधुनिक माहिती तंत्रज्ञानही त्याला अपवाद नाही. अभिव्यक्तीसाठी अनुरूप असे माहिती-तंत्रज्ञान इंग्रजीप्रमाणेच मराठीलाही तितक्याच सहज उपलब्ध आहे. आपली खरी समस्या या तंत्रज्ञानाची नाहीच, तर त्यातून आशय उभा करण्याची समस्या आहे. आजतागायत भाषेसाठी तंत्रज्ञानाची निर्मिती झाली आणि त्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भाषा वाढली, असेच घडत आले आहे. मात्र माहिती तंत्रज्ञान येताच, या तंत्रज्ञानाला अनुकूल आपली भाषा करण्याचा प्रयत्न

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

Smt. K. G. M. M. V. Daryapur

केला जात आहे. त्याऐवजी आपल्या भाषेला अनुकूल तंत्रज्ञान करण्याला भाग पाडले गेले पाहिजे. असे करण्यात मराठी माणूस कमी पडतो आहे हे कबूल केले पाहिजे आणि त्याचा दोष माहिती – तंत्रज्ञानाला देता येणार नाही. जपानने आपल्या भाषेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाकडे हा आग्रह धरला होता आणि त्यानुसार त्यांच्याकडे तंत्रज्ञान भाषानुकूल झाले.

**५.जागतिकीकरण व मराठी भाषेतील बदल -**

महाराष्ट्रापेक्षाही कितीतरी कमी लोकसंख्या असलेल्या सौदी अरेबियाने माहिती तंत्रज्ञानाला आपल्या भाषेनुसार बदल करण्यास भाग पाडले आहे. मग मराठी भाषकांना ते का शक्य होऊ नये? जगामध्ये हजारो भाषा बोलल्या जातात आणि हजारो लिप्यांमधून लिहिल्या जातात. तंत्रज्ञानापुढे त्या सगळ्या समान असतात. त्यामुळेच या सर्व लिप्यांचे सहअस्तित्व युनिकोडच्या साहाय्याने संगणकावर निर्माण केले गेले.

साधारण १९८०च्या दशकात संगणक उपलब्ध झाला. विशिष्ट परिस्थितीत सी-डॅकची स्थापना झाली. 'परम' हा महासंगणक तयार करण्याचे आव्हान आमच्यासमोर होते. हे काम विशिष्ट वेळेत पूर्ण करण्याचेही आव्हान होते. आम्ही या 'टाईमबाऊण्ड मिशन' मध्ये पूर्ण गढलो होतो. पण त्याचवेळी आमच्यातील काही जणांच्या एका गटाला भारतीय भाषांसाठी संगणकाचा उपयोग कसा करता येईल याचे प्रयोग करण्यास सुचवले होते. त्या गटाने यश मिळवताना केवळ भारतीय भाषांवर कामच केले नाही, तर कळपाटय़ाला प्रमाणित रूप दिले. मराठीसारख्या भाषेतील जोडाक्षरेही तयार केली. सिंधी भाषेची समस्या वेगळीच होती. सिंधीला स्वतःची लिपी नाही. त्यामुळे सिंधीभाषक देवनागरी, गुजराती व रोमन व तीन लिप्यांचा वापर करतात. त्यात कोणतेही प्रमाणीकरण नव्हते. पण सी-डॅकच्या तंत्रज्ञांनी तेही साध्य केले.

त्यामुळे संगणकावर, सुलभपणे, प्रभावीरीत्या भारतीय भाषांचा वापर करणे शक्य झाले. संगणकावर भाषा वापरायची तर त्यासाठी टूल्स द्यावी लागतात. त्यासाठी आवश्यक हार्डवेअर, सॉफ्टवेअर तयार केले. वर्ल्ड प्रोसेसिंग, डेस्कटॉप पब्लिशिंग व तत्सम व्यवहारात वापरली जाणारी सॉफ्टवेअर भारतीय भाषांसाठी तयार केली. १९९०च्या सुमारास इंग्रजी भाषेच्या बरोबरीने भारतीय भाषा संगणकावर वापरणे शक्य झाले. भाषेसाठी संगणकाचा किंवा तंत्रज्ञानाचा अडथळा उरला नाही. त्याचा फायदा भारतीय भाषांमधील वृत्तपत्रांना आणि पुस्तक निर्मितीला झाला. दूरचित्रवाणी व चित्रपट क्षेत्रालाही याचा फायदा झाला. संगणकाचा उपयोग करून सबटायटल्स देणे सोपे झाले. सध्या तर दूरचित्रवाणीच्या बातम्या पाहताना एकाच वेळी अनेक पट्टय़ा सरकताना दिसतात. हा तंत्रज्ञानाचा फायदाच आहे. युनिकोडप्रमाणे आम्ही इंडियन इन्फर्मेशन स्टँडर्ड कोड तयार केला. या प्रमाणीकरणाचा सर्वच भारतीय भाषांना फायदा होत आहे.

एक कळ दाबताच लिपी बदल करणे शक्य झाले, ही आमची महत्त्वाची कामगिरी आहे. त्यामुळे भारतीय भाषांमधील मज़कूर वाचणे शक्य झाले. उदाहरणार्थ, उर्दू उजवीकडून डावीकडे लिहिली जाते. पण मला उर्दूतील मजकूर देवनागरीत वाचायचा असेल तर देवनागरीलेखन पद्धतीने डावीकडून उजवीकडे लिहिलेला मजकूर माझ्या समोर



Smt. K. G. M. M. V. Daryapur

येतो. त्यामुळे तुम्हाला मिर्झा गालिब सहज वाचता येईल. ही तंत्रज्ञानाची किमया भाषेला उपयुक्तच आहे. तंत्रज्ञानाचा भाषेला उपयोग होतोच. संगणक तयार करणा-या संशोधकांनाही संगणकाने केलेल्या क्रांतीचा अंदाज आला नव्हता. पण संगणकाच्या, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मानवी संज्ञापनाने प्रचंड झेप घेतली आहे. इंटरनेट, वेब, सर्च इंजिन यामुळे मोठी क्रांती घडलेली आहे. एखाद्या ग्रंथपालाने पुस्तक शोधून द्यावे, तशी कोणतीही माहिती मला माझ्यासमोरच्या संगणकामुळे उपलब्ध होत आहे. ब्लॉग, वृत्तपत्रे, ई-बुक्स, जगातील सर्व साहित्यच आपल्या समोरच्या संगणकावर येऊ लागले आहे. आपल्या साहित्यिकांना, प्रकाशकांना याचे महत्त्व पटवून द्यावे लागेल. कोणत्याही तंत्रज्ञानापासून दूर राहण्याने आपलेच नुकसान होते, हे समजून घ्यायला हवे.

मराठी माणसाच्या स्वभावात एक दोष आहे. तो दुस-याला अनुकूल सहज वागू लागतो. व्यवहारातील उदाहरण घ्यायचे, तर एखादा रिक्षावाला हिंदीत बोलू लागला तर मराठी माणूसही हिंदीतच बोलू लागतो. तो रिक्षावाला महाराष्ट्रात येऊन सेवा देत असेल, त्याला गरज असेल तर त्याने मराठी शिकायला पाहिजे. पण तसे घडत नाही. तो त्याची भाषा बोलत राहतो आणि आपण आपली भाषा सोडतो. तंत्रज्ञानाच्या बाबतही आपण हेच करतो. आपण इंग्रजी भाषेतील तंत्रज्ञान लादून घेतो. पण असे म्हणत नाही की, तंत्रज्ञान विकणा-यांना आपली गरज लादून घेतो. पण असे म्हणत नाही की, तंत्रज्ञान विकणा-यांना आपली गरज आहे, म्हणून त्यांनी आपली भाषा स्वीकारली पाहिजे. इंग्रजीत व्यवहार करणे हे कुठेतरी आपल्याला अभिमानाचे वाटते, हा त्याचा अर्थ आहे.

इंग्रजी येणा-यांच्या पलीकडची बाजारपेठ मिळवण्यासाठी तंत्रज्ञान विकू येणा-यांनीच आता आपल्या भाषांचा वापर सुरू केला आहे. तुम्ही गुगल ॲडव्हान्स सर्चमध्ये गेलात आणि 'भाषा मराठी'वर क्लिक केले की, मराठीतील सर्व सर्च रिझल्टस् आपल्यासमोर झळकलेले दिसतील. शेकडो मराठी लोकांनी आपले मराठी ब्लॉग्ज, पोर्टल्स तयार करायला सुरुवात केली, तेव्हा गुगलसारख्या कंपनीला मराठी सेवा देणे भाग पडले. एक गोष्ट लक्षात घ्या, तंत्रज्ञानाच्या व्यापा-यांना स्थानिक भाषा, जागतिक भाषा असले काही कळत नाही, तर बाजारपेठेची भाषा कळते. महाराष्ट्राची हीच जमेची बाजू आहे.

सुमारे बारा कोटी मराठी लोकांचा प्रचंड असा एक भाषक गट म्हणजे महाराष्ट्र आहे. जगात मराठी भाषक गटाचा संख्यानिहाय पंधरावा क्रमांक आहे. आपल्या अस्मितेच्या व अस्तित्वाच्या दृष्टीने ही मोठी महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे आपण दैनंदिन व्यवहार मराठीतूनच करण्याचा आग्रह धरला तर आपल्याला तसे तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले जाईल. संगणकावर असे तंत्रज्ञान उपलब्ध होऊ लागले आहे. ग्रामीण भागात मोबाईल वापरणा-यांची संख्या वाढू लागताच मोबाईलवरही मराठीतून तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले जाऊ लागले आहे. म्हणजे मराठीच्या अस्तित्वाचा प्रश्न तंत्रज्ञानाशी निगडित नाही.

**६. मराठीला तंत्रज्ञानाचा अडथळा नाही-** अडथळा असेलच तर तो आपल्याच मानसिकतेचा आहे. इंग्रजीचे मांडलिकत्व पत्करण्याच्या आपल्या मानसिकतेमागे तंत्रवैज्ञानिक कारण नाही, तर ते सामाजिक कारण आहे. आपण अगदी शासकीय भाषा वापरतानाही सर्वसामान्य लोकांना कळणार नाही, याची जणू काळजी घेतो. ज्ञान, विज्ञान,

Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

Smt. K. G. M. M. Daryapur

तंत्रज्ञान, आर्थिक-राजकीय व्यवहार, प्रशासन, न्यायव्यवस्था, आपले सर्वच व्यवहार सर्वसामान्यांना कळतील अशा भाषेत करण्याचा आग्रह आपण धरला तर मराठीला कसलीचअडचण येणार नाही.

इंग्रजी भाषा शिकण्याला महत्त्व आहे. पण इंग्रजी ही आपल्या प्रगतीतील अडसर बनता कामा नये. इंग्रजी येते तोच ज्ञानी आणि बाकीचे अडाणी ही समजूत खरी नाही. इंग्रजी बोलणा-याला विनाकारण प्रतिष्ठा दिली जात आहे. त्यामुळे इंग्रजी बोलू न शकणा-यांमध्ये उगाचच न्यूनगंड तयार होतो. त्याचा परिणाम मराठीचा अभिमान बाळगण्यावर होतो. मग इंग्रजी शाळा वाढतात व मराठी शाळा मागे पडतात. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतही चांगले मराठी शिकवण्याचा आग्रह आपण का धरत नाही? मल्याळम, तेलगू, कन्नड, तमीळ या दक्षिणात्य भाषा शिकवण्याबाबत, बोलण्याबाबत, व्यवहारात वापरण्याबाबत ते ते भाषक गट जागरूक आहेत आणि आपण तेवढे आग्रही नाही, ही आपली समस्या आहे. सध्या अनेक तरुण-तरुणींना मराठी बोलता येते, पण नीट लिहिता येत नाही. त्यांच्याकडे वही-पेन नसते, तर ते मोबाईलवर टंक करून घेतात. त्यामुळे त्यांना मराठी अक्षरांचे वळण नीट जमत नाही. ऱ्हस्व, दीर्घ नीट जमत नाही. मला वाटते की, महाराष्ट्रात सर्व माध्यमांच्या शालेय शिक्षणात प्रथम भाषा म्हणून मराठी सक्तीने शिकवली जायला हवी.

आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. भाषा नेहमी दोन पातळ्यांवर अभिव्यक्त होत राहिली आहे. साहित्याची भाषा व दैनंदिन लोकव्यवहाराची भाषा. अभिजनांची भाषा व बहुजनांची भाषा. या दोन्ही प्रकारच्या भाषांमध्ये खूपच तफावत आढळते. ही दरी दूर केली पाहिजे. भाषेचे सुलभीकरण व्हायला हवे. मराठीसाठी आग्रही राहिले पाहिजे. इंग्रजीचा वृथा अभिमान सोडला पाहिजे. सध्या दिसणारे चित्र असे आहे की, ग्रामीण भागातही मुले इंग्रजी शाळांमध्ये जात आहेत. या शाळांमधून मराठी असून नसल्यासारखीच असते. त्यामुळे या मुलांना मराठी नीट बोलताही येत नाही की, लिहिताही येत नाही. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील शिक्षकांना इंग्रजी नीट बोलता येत नाही. त्यामुळे हे शिक्षक व मुले यांचा बहुतेक संवाद मराठीतूनच होतो.

साहजिकच या मुलांना इंग्रजीही नीट बोलता अगर लिहिता येत नाही. कोणतीच भाषा चांगली येत नाही, तो समाज अभिव्यक्त होऊ शकत नाही. त्याच्या विकासात अडथळा येतो याकडे आपले दुर्लक्ष होत आहे. हे असे अर्धवट इंग्रजी शिकवून आपल्या मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण करण्यापेक्षा तंत्रज्ञानाचा वापर करून त्याला मराठी भाषेतून जागतिक बाजारपेठेच्या संपर्कात ठेवू या.

**निष्कर्ष -**

१.मराठी ही ज्ञान-विज्ञानाची भाषा व्हायला हवी. केवळ व्यावहारिक भाषा, बोलीभाषा एवढेच तिचे स्वरूप नको.

२. तंत्रज्ञान वेगाने विकसित होत आहे. दर अठरा महिन्यांनी ते द्विगुणित होते आहे. आपल्या हातातील मोबाईलमध्येच सुपर कम्प्युटरची क्षमता आली आहे.

२. जपानने इंग्रजी-जापनीज असा एक मोठा प्रकल्प १९८० मध्ये हाती घेतला होता. त्या प्रकल्पात आता पाचव्या पिढीचा संगणक तयार झाला आहे. हे मोठे आव्हान होते. अर्थात मानवी मेंदूची क्षमता अशा संगणकांहून अधिक आहे. भाषेबाबत तर संगणक मेंदूच्या क्षमतेहून मागेच राहतील. लहान मुलालाही जे भाषेतून अभिव्यक्त करता येईल

Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

Smt. K. G. M. M. D.

ते संगणकाला शक्य नाही. तरीही तंत्रज्ञ अनेक सॉफ्टवेअर विकसित करीत आहेत. मराठीसाठीही रिसर्च सेंटर असावे असा विचार आम्ही मांडला होता. सरकारने हे सेंटर मंजूरही केले आहे. पण हे सातत्याने करावे लागणारे काम आहे. महाराष्ट्रात पारमार्थिक भाषेतून संतसाहित्याची निर्मिती झाली होती.

३. संतसाहित्याचे मल्टिमीडियात रूपांतर करण्याचा प्रयत्न वीस वर्षापूर्वी सी-डॅकने केला होता. त्यावेळी ते आताच्या इतके सहजसाध्य नव्हते. पण सी-डॅकने त्यात यश मिळवले होते.

इतकेच सांगायचे की, जीव तेथे भाषा आहे.

४. पशू-पक्ष्यांचीही भाषा असतेच. मुंग्यांची व मधमाश्यांची भाषा उलगडण्यात माणसाला यशही आले आहे. पण या भाषा योग्य तंत्रज्ञानाच्या अभावामुळे विकसित झालेल्या नाहीत.

५. माणसाने तंत्रज्ञान उभारून आपल्या भाषा विकसित केल्या. आता डिजिटल युगात डिजिटल तंत्रज्ञान वापरूनच दैनंदिन व्यवहार केले जाणार आहेत. ६. अशावेळी भाषिक व्यवहारासाठी तंत्रज्ञान अपरिहार्य ठरणार आहे. तंत्रज्ञान झिडकारून भाषा टिकणार नाही. भाषेचा लोप म्हणजे संस्कृती नष्ट होणे होय.

७. त्यामुळेच भाषेमागे तंत्रज्ञान भक्कमपणे उभे करावे लागेल. भाषा ही तंत्रज्ञानाला आव्हान असते व ती आवाहनही करते. भाषा व तंत्रज्ञान या दोघांनीही परस्परांना कवेत घेऊन पुढे जायला हवे.

**संदर्भ -**

*मराठी भाषेचा उगम आणि विकास*
*द लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया जॉर्ज गिअर सन*
*इंटरनेट सोर्स ऑफ आर्टिकल.*
*मराठी भाषा समृद्धी- लेख*
*मराठी भाषेतील तंत्रज्ञान लेख*
*मराठी भाषा युनिकोड लेख*

Smt. K. G. M. M. V. Daryapur

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*